g) अशा इमारतींचे Structural Design हे भुकंप प्रतिबंधक असणे आवश्यक राहील. अर्जदाराने / विकासकाने / जमिनमालकाने इमारतीचे Structural Stability बाबत नोंदणीकृत Structural Engineer चे प्रमाणपत्र संबंधित अग्निशमन अधिकारी यांचेकडे व या प्राधिकरणाकडे दाखल करणे आवश्यक राहील.

h) भोगवटा प्रमाणपत्र देण्यापूर्वी सर्व अग्निशमन यंत्रणा व सुविधांची पूर्तता करुन सदर यंत्रणा सुस्थितीत कार्यान्वित असलेबाबत अग्निशमन विभागाकडील अंतिम नारहकत प्रमाणपत्र सादर करणे अर्जदार / विकासक / जमिनमालक यांचेवर बंधनकारक राहील.

i) संचालक, महाराष्ट्र फायर सर्व्हिसेस, मुंबई यांचे जा.क्र.एमएफएस/५१/२४१, दिनांक-२२/०४/२०१५ अन्वये ना हरकत दाखला व सोबतचे नकाशे सांक्षाकीत केलेले आहेत. सदरचे नकाशामध्ये मंजूरी देताना फेरबदल झाल्यास अशा नियोजनास संबंधित मुख्य अग्नीशमन अधिकारी / संचालक यांचे सुधारित ना हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे.

**३०.** **सदर प्रस्तावाखाली क्षेत्र महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या संपादनाखाली नसल्याबाबत अर्जदार यांनी दिनांक-१७/०६/२०१५ अन्वये हमीपत्र सादर केलेले आहे. त्याधारे मंजूरी देण्यात येत आहे.**

**३१.** **सदर जागेतील प्रस्तावित २३.० मी. बफर झोनमध्ये कोणतेही बांधकाम / विकास अनुज्ञेय नाही.**

**३२.** **सदर प्रस्तावामधील सहसंचालक, नगर रचना, यांच्या मान्य रेखांकनात बदल करावयाचा असल्यास त्यास सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे यांची मान्यता घेणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.**

**३३.** **सुविधा क्षेत्र Proper access व basic land development करुन पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरणाकडे चटई क्षेत्र निर्देशांकाच्या बदल्यात हस्तांतरित करणे बंधनकारक राहील. तसेच सद्यस्थितीत सुविधा क्षेत्रामध्ये खुल्या स्वरुपाचे वापर अनुज्ञेय होतील. सदर सुविधा क्षेत्राच्या भुखंडाची मोजणी करुन असा स्वतंत्र भूखंड वरीलप्रमाणे विकसन करुन व जिल्हाधिकारी यांचे मंजूरीनुसार कुंपणभिंत बांधून त्याचा स्वतंत्र ७/१२ उतारा जिल्हाधिकारी यांचे नावे करुन, सदर सुविधा क्षेत्राच्या जागेचा चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करण्यापूर्वी, रितसर पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करणे आवश्यक राहील.**

पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण PMRDA

प्रतिलिपी

